**SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.**
**Affiliation No. 1130703**
**Academic session 2024-25** | **std.8th**
**NOTES-11 (TERM-II)**
**Subject - Marathi**

**Prepared by: Renuka Joshi** **LESSON-११.पेडगावचा भुईकोट किल्ला**

---

**पूर्व उपक्रम** – महाराष्ट्रातील कोणत्याही पाच किल्ल्यांची नावे लिहा.

**शब्दार्थ.** १.कुप्रसिद्धी - वाईट प्रसिद्धी २. जलदुर्ग - पाण्यातील किल्ला

३. प्राचीन – जुने,पुरातन ४. निडर - न घाबरणारा

**वाकप्रचार**.

१. धिंड काढणे - जाहीरपणे बेइज्जत करणे.

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. छत्रपती संभाजी महाराजांना मृत्युदंडाची शिक्षा कोणत्या ठिकाणी दिली?

**उत्तर** - छत्रपती संभाजी महाराजांना मृत्युदंडाची शिक्षा 'पेडगाव येथील दरबारात झाली.

२. पेडगावच्या किल्ल्यातील सर्वात प्राचीन व सुंदर मंदीर कोणते?

**उत्तर** - लक्ष्मी नारायण मंदिर हे पेडगावच्या किल्ल्यातील सर्वात प्राचीन व सुंदर मंदीर आहे.

३. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यावर हल्ला करून किती खजिना मिळविला होता?

**उत्तर** - छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यावर हल्ला करून २०० अरबी घोडे व एक कोटींचा शाही खजिना मिळविला.

४. पेडगाव किल्ल्यातील प्रसंगावरून कोणत्या म्हणी प्रचलित झाल्या होत्या?

**उत्तर** - पेडगाव किल्ल्यातील प्रसंगावरून 'वेड घेऊन पेडगावला जाणे'व 'आला पेडगावचा शहाणा' या म्हणी प्रचलित झाल्या होत्या.

५. संभाजी महाराज यांना औरंगजेबसमोर कोणत्या किल्ल्यात हजर करण्यात आले?

**उत्तर** - संभाजी महाराज यांना औरंगजेबसमोर पेडगावच्या किल्ल्यात हजर करण्यात आले.

**प्रश्न २. रिकाम्या जागा भरून वाक्य पूर्ण करा.**

१. बहादुरखानला छत्रपती शिवाजी महाराज पेडगावचा शहाणा म्हणत असे.

२. पेडगावचा किल्ला हा भुईकोट किल्ला आहे.

३. रामेश्वर मंदिर ,मल्लिकार्जुन मंदिर, बालेश्वर मंदिर,तत्कालेश्वर मंदिर,ही महादेव मंदिरे आहेत.

४. शिवाजी महाराजांचे पणजोबा बाबाजीराजे भोसले यांकडे पेडगावचा चा परिसर देखभालीसाठी होता.

**उपक्रम - किल्यांची कात्रणे गोळा करून वहीत चिकटवा.**

**S.Teacher** **HOD** **Co –Ordinator** **Principal**